## <u>रे.दि.मु.नं.१८/२०१५ मधील निशाणी १३८ वरील आदेश</u>

(दिनांक १२/११/२०२१)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. २९ श्री. गोविंद रामचंद्र कुलकर्णी हे दिनांक २४/०३/२०२१ रोजी मयत झाले आहेत. कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावामुळे वादीस मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. २९ विरुध्द दावा अबेट झाला आहे. दावा अबेट झाला आहे. सदरचा अबेटमेंट चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. अर्जदार यांच्या अर्जातील कथने व अभिलेखाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, दावा गैरहक्काच्या कब्जासाठी व निरंतर मनाईकरीता आहे. दाव्यामध्ये वादी व प्रतिवादींचे हक्कहितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे गुंतागुंत टाळण्याकरीता मयत प्रतिवादीच्या वारसांना या कामी दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र. २९ विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणे योग्य होईल. सबब, आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर.

२. प्रतिवादी क्र. २९ विरुद्धचा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः– १२/११/२०२१

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

इस्लामपूर.

**<u>रे.दि.मु.नं.१८/२०१५ मधील निशाणी १३९ वरील आदेश</u>**

(दिनांक १२/११/२०२१)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. २९ श्री. गोविंद रामचंद्र कुलकर्णी हे दिनांक २४/०३/२०२१ रोजी मयत झाले आहेत. कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावामुळे वादीस मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. २९ विरुध्द दावा अबेट झाला आहे. दावा अबेट झाला आहे. त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. दाव्याचे स्वरुप विचारात घेता दावा गैरहक्काच्या कब्जासाठी व निरंतर मनाईकरीता आहे. दाव्यामध्ये वादी प्रतिवादींचे हक्क व हितसंबंध असल्याचे दिसुन येते. मयत प्रतिवादीचे वारस या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांच्याशिवाय दाव्याच्या वाद विषयाचे समुळ निराकरण होणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी नं. २९ श्री. गोविंद रामचंद्र कुलकर्णी यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः– १२/११/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.

**<u>रे.दि.मु.नं.१८/२०१५ मधील निशाणी १४० वरील आदेश</u>**

(दिनांक १२/११/२०२१)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. २९ श्री. गोविंद रामचंद्र कुलकर्णी हे दिनांक २४/०३/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे प्रतिवादी नं. २९अ) श्रीमती वसुंधरा गोविंद कुलकर्णी, २९ब) विनोद गोविंद कुलकर्णी (मयत वारस – २९ब.अ. अमृता विनोद कुलकर्णी, २९ब.ब. तेजस विनोद कुलकर्णी, २९ब.क. तुषार विनोद कुलकर्णी व २९क) विजय गोविंद कुलकर्णी हे वारस आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याकामी प्रतिवादी क्र. २९ चे वारस म्हणुन दाखल करुन घेणेस परवानगी मिळण्यासाठी केला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. वादीच्या अर्जातील कथने व अभिलेखाचे अवलोकन केल्यास प्रतिवादी क्र. २९ हे ता. २४/०३/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. अर्जदार यांच्या कथनानुसार मयत प्रतिवादी क्र. २९ यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर घेतल्यास दावा गुणदोषावर निकाली करण्यास मदत होणार आहे. भविष्यातील दावे प्रतिदावे टाळण्यासाठी सदर दुरुस्ती आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, आदेश.

**आदेश**

१. अर्ज मंजुर.

२. अर्जात नमुद केलेप्रमाणे वादी दाव्यात करु इच्छीत असलेली दुरुस्ती त्यांनी आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसांत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादींना देखील पुरवावी.

३. अर्जाचा खर्च वादीनी सोसावा.

sd/xx
(भूषण र. ठाकूर)
दिनांकः– १२/११/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इस्लामपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. Pradip T. Patil |
| Court | : | Jt. Civil Court Sr.Dn.Islampur |
| Date of Order/Judgment | : | 12/11/2021 |
| Typed on | : | 12/11/2021 |
| Signed by P.O. on | : | 12/11/2021 |
| Uploaded on | : | 13/11/2021 |